जा क्र.ई-१/-पोउपनि बि.सं.(वीजतंत्री)/पदोन्नती/२०१६-४१५३
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे ८
यांचे कार्यालय. दिनांक :- 22 / ०६ / २०१६

विषय :- पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ( वीजतंत्री ) यांना पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( वीजतंत्री.) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना बाबत. (२०१५-२०१६)

*************

**आ दे श**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( वीजतंत्री ) यांना पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश ( वीजतंत्री ) या पदावर त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून स्थानापन्न व निव्वळ तात्पुरती ( provisional ) पदोन्नती देऊन नेमणूक देण्यात येत आहे.

सहा. पो.उपनि बि.सं.(वीजतंत्री ) - वेतन बॅन्ड पीबी-१ रु.५२०० - २०२००+ ग्रेड पे २८००
पो उप निरीक्षक बि स (वीजतंत्री) वेतन बॅन्ड पीबी- रु.९३०० - ३४८००+ ग्रेड पे ४३००

| अ. क्र. | सपोउनि (वीजतंत्री. ) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. जाधव दत्तात्रय रंगनाथ** ( प्रवर्ग- अनु.जमाती ) | पोलीस उप अधीक्षक बि.सं.नाशिक परिक्षेत्र, नाशिक | **नागपूर शहर** (आस्थापना- पोलीस आयुक्त, नागपूर शहर ) | अनुसुचीत जमाती प्रवर्गातून | रिक्त पदी |
| २ | **श्री.मोरे महादेव रामचंद्र** ( प्रवर्ग - अनु.जाती ) | ठाणे शहर (आस्थापना - पोलीस आयुक्त, ठाणे शहर ) | **मुंबई शहर** (पोलीस उप आयुक्त, बि.सं. मुंबई ) | अनुसुचीत जाती प्रवर्गातून | रिक्त पदी |
| ३ | **श्री.घंटी विठ्ठल प्रल्हाद ( प्रवर्ग - भज - क )** | संशोधन व विकास, पुणे (आस्थापना - संचालक बि.सं. पुणे) | संशोधन व विकास, पुणे (आस्थापना - संचालक बि.सं. पुणे) | खुला प्रवर्गातून | रिक्त पदी |
| ४ | **श्री.बेंडाळे वासूदेव गोविंदा ( प्रवर्ग - इ.मा.व.)** | पोलीस उप अधीक्षक बि.सं. औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद) | **औरंगाबाद शहर ( आस्थापना - पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर)** | खुला प्रवर्गातून | रिक्त पदी |

२ सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे

३ पदोन्नतीवर पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून त्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांच्या पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबत बदल करण्यात येईल

४ उपरोक्त कर्मचा-या विरुध्द विभागीय चौकशी / कोर्ट केस / अन्य चौकशी चालू असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, शिक्षेची अंमलबजावणी होणेसाठी पदोन्नतीच्या उच्च पदावर ते शिक्षा भोगण्यास तयार असल्याबाबत लेखी संमती पत्र संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचेकडून त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करणे पूर्वी घ्यावे .जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

५ पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८ / प्रक्र - १३ / ९८/ सेवा -१० दि.१० / १२ / ९८ च्या आदेशाची माहिती पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( वीजतंत्री ) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा--यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन ) नियम - १९८१, नियम क्र.११(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

६ कालबध्द पदोन्नती घेतली असल्यास संबंधीत कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही संबंधीत कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबध्द पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी ) काढून घेण्यात यावी व त्याप्रमाणे अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवावी

७ उपरोक्त पदोन्नती झालेल्या सपोउनिबिसं (वीजतंत्री) यांना पदोन्नतीच्या / बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करून त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक व पोलीस उपनिरिक्षक बि सं (वीजतंत्री) या पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा तसेच सबंधीत आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये पदोन्नतीचा आदेश क्रमांक व दिनांकाची नोद घ्यावी.

**( जगन नाथ )**
**अपर पोलीस महासंचालक व संचालक,**
**पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति ,**

सर्व संबंधीतांना.
पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.
पोलीस अधिक्षक , बि सं , पूर्व विभाग, नागपूर / पश्चिम विभाग, पुणे.
पोलीस उप आयुक्त, बि.सं., मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, बि सं संशोधन व विकास विभाग, पुणे.

प्रत सादर - मा पोलीस महासंचालक , म रा, मुंबई. (लक्षवेध - का क्र ५ अ )

प्रत सस्नेह अग्रेषितः-

पोलीस आयुक्त, मुंबई / नागपूर / ठाणे शहर

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, बि.सं., औरंगाबाद परिक्षेत्र/ नाशिक परिक्षेत्र /
सहायक पोलीस आयुक्त, बि.सं. ठाणे शहर / नागपूर शहर

स्थानिक प्रती :-

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.
पोलीस उप अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय पुणे .
कार्यालय अधिक्षक / स्वीय सहाय्यक / प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - १ व २/ ई-४ लिपीक /
लेखा शाखा/ भरती कक्ष /क'शाखा / आदेश -फाईल.